CMYK

दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव ■ अंक 201 ■ वर्ष 2 रे ■ मंगळवार, दि. 2 सप्टेंबर 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5

# सरकारविरोधी मोर्चा असूनही सत्ताधारी खासदार नळदुर्गकरांनी दिल्लीत केली होती आंदोलकांची सोय

## सत्ताधाऱ्यांनो, ॲड.व्यंकटराव नळदुर्गकर, उद्धवराव पाटलांचा आदर्श घ्या

चंद्रसेन देशमुख | आरंभ मराठी

धाराशिव:महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात तत्त्वनिष्ठा आणि सुसंस्कृत आचारधर्म पाळणारे नेते काळाच्या ओघात अधोरेखित होतात. आज त्यांची प्रकर्षाने आठवण येते. कारण आजचे कुरघोडीचे, सुडाचे राजकारण आणि संवदेनाहीन सरकार. कारण आपल्याच सरकारविरोधात दिल्लीत मोर्चा घेऊन आलेल्या विरोधी पक्षाच्या नेत्याची आणि आंदोलकांची दिल्लीमध्ये जेवणाची आणि निवासाची सोय करणारे सत्ताधारी खासदार या महाराष्ट्राने पाहिलेत,त्यांची वैचारिक भूमिका, तत्व, विचार, संस्कार हे राजकारणापलीकडचे होते.

१९५७ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे धाराशिवचे तत्कालीन खासदार स्व. व्यंकटराव नळदुर्गकर यांनी शेकापचे नेते भाई उध्दवराव पाटील यांचा पराभव केला होता.पुढच्या काही वर्षात दिल्लीत भाई उद्धवराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरकारविरोधात आंदोलन झाले. विरोधी पक्षाचे नेते आणि सरकारच्या विरोधात असतानाही आंदोलन असूनही खासदार ॲड. नळदुर्गकर यांनी राजकारण, विरोधी भूमिका याचा विचार न करता आपल्या भूमितील शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये, म्हणन आंदोलनकर्त्यांच्या राहण्यापासून जेवणापर्यंत जबाबदारी स्वतः उचलली. कारण त्यांना माणुसकी आणि विरोधकांचा सन्मान हे राजकारणापलीकडचे वाटत होते. आजच्या मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हे प्रसंग पुन्हा जिवंत होतात. एकमेकांप्रति आत्मियता, राजकारणापलीकडे माणूस म्हणून पाहण्याची वृत्ती तत्कालिन नेत्यांमध्ये होती. गेल्या काही दिवसांत मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाचे लाखो बांधव मुंबईत दाखल झाले आहेत. आझाद मैदानात जागा न उरल्याने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपासून वेगवेगळ्या भागात आंदोलक मिळेल तिथे आसरा घेत आहेत.त्यांच्या घोषणांनी राजधानी दणाणून गेली आहे. 'आरक्षण मिळालेच पाहिजे, अशी एकच गर्जना ऐकायला मिळत आहे. परंतु या मोठ्या आंदोलनाला प्रशासनाने कोंडीत पकडल्याचे आरोप होत आहेत. पाणी, शौचालये, निवासाची ठिकाणे किंबहुना आंदोलनावरही निर्बंध आणले जात असल्याने महाराष्ट्रात संताप आहे. सरकार प्रश्न सोडविण्याऐवजी त्रास देण्याचा मार्ग अवलंबत असेल तर आपण सांगतो त्या प्रगल्भ संस्कृतीचे काय ?, कुणी विरोधात वक्तव्ये केली म्हणून आपण समाजाची उपासमार करून थर सोडावा, एवढी मजबुरी राज्याच्या प्रमुखावर आलीय का,असा प्रश्न उपस्थित होतो.आज महाराष्ट्राला हवे आहेत ते भाई उद्धवराव पाटील यांची तत्त्वनिष्ठा आणि



ॲड.व्यंकटराव नळदुर्गकर



भाई उद्धवराव पाटील

व्यंकटराव नळदुर्गकर यांचा आदर्श. हे नेते प्रातिनिधिक म्हणून मांडत असलो तरी महाराष्ट्राच्या सुसंकृत परंपरेला साजेसे राजकारण करणारे असंख्य नेते आपला आदर्श आहेत. सत्ताधाऱ्यांनी हा इतिहास लक्षात घ्यावा, विरोधकांचा सन्मान राखावा आणि आंदोलनाला तडजोडीपेक्षा संवादाने उत्तर द्यावे. कारण अन्नपाणी रोखून प्रश्न सुटत नाहीत; उलट असंतोषाची ठिणगी आणखी भडकवली जाते. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला साजेसा मार्ग म्हणजे आंदोलनकर्त्यांचा सन्मान राखत तोडगा काढणे. आज राज्यकर्त्यांची खरी कसोटी यावरच लागणार आहे.

### हे लोकशाहीला मान्य आहे?

राजकीय परंपरेतून काही शिकण्याऐवजी ही दडपशाहीची पद्धत का वाढते आहे, हा प्रश्न आहे. एकेकाळी विरोधकांच्या आवाजाला वैचारिक उत्तर देणारे नेते होते. त्यांच्यासाठी घराची दारे, स्वयंपाकघरे खुली होती. भाई उद्धवराव पाटील यांच्या संदर्भाने अनेक दाखले मिळत राहतात. केवढ्या उच्च विचारांची राजकीय परंपरा आपली. मानवतेच्या आधारावर विरोधकांचीही सोय केली जायची. आज त्याच जागी आंदोलकांच्या मुलभूत गरजांवर बंधने घालून संघर्षाची तीव्रता वाढवली जाते. परिणामी, मराठा समाजात केवळ आंदोलन नव्हे तर शासनाविरुद्ध अविश्वास आणि राग अधिक तीव्र होताना दिसत आहे.न्यायालयाच्या आडून आंदोलनं मोडून काढणे हे लोकशाहीचे लक्षण आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

# नांदेड-पंढरपूर एक्सप्रेसला कळंब रोडवर थांबा मंजूर

## खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या पाठपुराव्याला यश

आरंभ मराठी | कळंब

कळंब तालुक्यातील प्रवाशांची अनेक वर्षांची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. दक्षिण-मध्य रेल्वेच्या नांदेडपंढरपूर एक्सप्रेस (११४१३/११४१४) या गाडीला कळंब रोड स्टेशनवर थांबा मंजूर करण्यात आला आहे. रेल्वे बोर्डाने आदेश जारी करून या थांब्याला मान्यता दिली आहे.रेल्वे प्रशासनाने हा थांबा प्रायोगिक तत्त्वावर मंजूर केला असून लवकरच त्याची अंमलबजावणी होणार आहे. या कालावधीत तिकीट विक्री व प्रवाशांचा प्रतिसाद यावर देखरेख ठेवून पुढील निर्णय घेतला जाणार आहे.या निर्णयामुळे कळंब परिसरातील नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, शेतकऱ्यांना बाजारपेठेतील व्यवहारासाठी तसेच पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांना मोठी सुविधा



मिळणार आहे. हा निर्णय खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शक्य झाल्याचे मानले जातअसून, तालुक्यातील नागरिकांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# धाराशिवमध्ये गौरी सजावट स्पर्धा

**धाराशिव:-** शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने गौरी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.आमदार रणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रेरणेने व जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष,लेडीज क्लबच्या अध्यक्षा अर्चनाताई रणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा होत असून, सजावट स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.स्पर्धेसाठी विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक रु. ११,०००, द्वितीय पारितोषिक रु. ५,०००, तर तृतीय पारितोषिक रु. ४,००० ठेवण्यात आले आहे. याशिवाय २१०० रुपयांची ५ बक्षिसे तसेच सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.तुमच्या गौरीच्या सजावटीचे सुंदर फोटो खाली दिलेल्या मोबाईल क्रमांकावर व्हॉट्स ॲप करावेत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. मोबाईल क्रमांक ८३०८१९९५१६ / ८८०५०५०८०८.

# देशी-विदेशी दारू साठ्यावर शिराढोण पोलिसांचा छापा

**शिराढोण:**शिराढोण पोलिस ठाण्याच्या पथकाने देशी व विदेशी दारूच्या बेकायदेशीर साठ्यावर कारवाई केली. बनावट दारू तयार होत असल्याची गोपनीय माहिति शिराढोण पोलिसांना मिळाली त्याआधारे सपोनि धरणीधर कोळेकर व कर्मचारी तसेच महिला पोलिस अमलदारांनी पंचासमवेत छापा टाकला. छाप्याची चाहूल लागताच आरोपी खय्युम आयुब कुरेशी (रा. शिराढोण) हा घटनास्थळावरून फरार झाल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र त्याचा भाऊ रिजवान आयुब कुरेशी हा ठिकाणी हजर होता त्याच्याकडून दारूचा मोठ्या प्रमाणावरचा साठा जप्त करण्यात आला.याप्रकरणी पोलिस हवालदार राजेश शेळके यांच्या फिर्यादीवरून दोन्ही भावाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी विना परवाना व बेकायदेशीरपणे देशी-विदेशी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने साठा ठेवला असल्याचे तपासात समोर आले.

# मनोज जरांगे पाटील यांना महालक्ष्मीचा पाठिंबा !




मुंबईत मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला विविध स्तरांतून पाठिंबा मिळत असताना धाराशिव शहरातील महालक्ष्मी अर्थात गौरींच्या माध्यमातून पाठिंबा देणारा देखावा साकारण्यात आला आहे. शहरातीलतांबरी विभागयेथील बिभीषण मोरे यांच्या घरचा महालक्ष्मी देखावा मराठा आरक्षणसाठी मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देत असल्याचे दर्शवित आहे. या अनोख्या देखाव्याने सगळ्यांचे लक्ष वेधले आहे.

# निरागस चिमुकल्याला मायेच्या कुशीत मिळाले नवे आयुष्य

## अंकुरच्या दत्तक सोहळ्यात हृदयस्पर्शी क्षण,भाजप जिल्हाध्यक्ष कुलकर्णी यांच्याकडून भावनिक उद्गार

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरातील अंकुर शिशुगृहात नुकत्याच झालेल्या दत्तक विधान सोहळ्यात चार महिन्यांच्या लहानग्याने एका प्रेमळ कुटुंबाच्या मायेच्या कुशीत प्रवेश केला आणि उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू दाटले. निराधारतेच्या अंधारातून नव्या आयुष्याच्या उजेडाकडे जाणारा हा क्षण केवळ औपचारिकता नसून नव्या जीवनाचा प्रारंभ ठरला.सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून भाजप जिल्हाध्यक्ष व श्री सिद्धीविनायक परिवाराचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी, तुळजापुरचे माजी नगरसेवक व तुळजाभवानी प्रक्षाळ मंडळ अध्यक्ष विशाल रोचकरी, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. गोविंद कोकाटे,विक्रम पाटील यांची प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थिती होती. तसेच डॉ. रमेश दापके, डॉ. दिग्गज




दापके-देशमुख, डॉ. अर्शद रजवी, डॉ. वसुधा दापके-देशमुख, सौ. दिपाली दत्ता कुलकर्णी, सौ. राजश्री विक्रम पाटील, प्रा. सोमनाथ लांडगे, गणेश वाघमारे, इश्वर राठोड, शोएब शेख, फेरोज पल्ला, गजानन पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.आपल्या भाषणात दत्ता कुलकर्णी म्हणाले, जशी यशोदा श्रीकृष्णाला वाढवते, तशीच दत्तक कुटुंबे निराधार बालकांना प्रेम, संस्कार व नवे जीवन देतात. ही केवळ प्रक्रिया नाही, तर समाजासाठी प्रेरणादायी संदेश आहे. मान्यवरांनीही एकमुखाने आवाहन केले की समाजातील प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून अंकुर शिशुगृहाच्या उपक्रमांना हातभार लावावा. वाढदिवस, विवाहसोहळे किंवा खास क्षण येथे साजरे केल्यास या छोट्या देवदूतांना मिळणारा आनंद हा खऱ्या अर्थाने मोठा उत्सव ठरेल. दत्तक प्रक्रिया ही महिला व बाल विकास विभाग, बाल कल्याण समिती व केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (CARA) यांच्या नियमांनुसार कायदेशीर आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडली जाते. त्यामुळे बालक आणि दत्तक कुटुंब दोघांचाही हक्क सुरक्षित राहतो.अंकुर शिशुगृह हे फक्त निराधार बालकांचे संगोपन करणारे ठिकाण नाही, तर त्यांच्या उज्वल भविष्याची वाट दाखवणारे घर आहे. आतापर्यंत अनेक बालके इथून दत्तक जाऊन कुटुंबाच्या उबेत वाढली आहेत.

आरंभ मराठी **परंडा तालुक्यातील सिरसाव येथील संगम ग्रुप गणेशोत्सव मंडळाचे कौतुकास्पद कार्य**

# २५ वर्षापासून सामाजिक उपक्रमांची परंपरा

अर्जुन गोडगे | आरंभ मराठी

परंडा तालुक्यातील सिरसाव येथील गणेश मंडळाने आयोजित केलेल्या विविध सामाजिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पसरवला आहे. संगम ग्रुप यांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महिलांसाठी विशेष स्पर्धांचे आयोजन, पारंपारिक वाद्याचा जागर, प्रबोधनात्मक कार्यक्रम किर्तन भारुड, शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन असे विविध उपक्रम राबवून समाजप्रबोधनाचे कार्य केले जात आहे.मंडळाचे अध्यक्ष रुपेश चोबे म्हणाले, आमचा प्रयत्न असा आहे की देवाच्या उपासनेबरोबरच समाजहिताची कार्ये ही घडावीत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. उत्सव हा फक्त आनंदाचा नसतो तर तो समाजाला एकत्र आणण्याचे काम करतो. आमच्या सर्व उपक्रमांमध्ये ग्रामस्थाचा लोकांचा सहभाग आणि आशीर्वाद लाभला. आकर्षक विद्युत रोषणाईने प्रकाशात गणपतीची मूर्ती उजाळून निघाली आहे, आकर्षक गणेशाची मूर्ती हे मंडळाचे वेगळेपण आहे या




ठिकाणी भक्तिमय वातावरण दिसून येत आहे. गेल्या पाच वर्षापासून मंडळाने डीजे मुक्तीचा निर्धार केला असून पारंपारिक वाद्याच्या गजरामध्ये मोठ्या भक्तीमय वातावरणामध्ये मिरवणूकही संपन्न होत असते. या गोष्टींमध्येच या मंडळाचे वेगळेपण दिसून येते. हे गणराया सरकारला सद्बुद्धी दे, मराठा आरक्षणासाठी, शेतकरी कर्जमाफीसाठी व सायबर सुरक्षेसाठी सरकारने तातडीने उपाय योजना राबवण्यात अशा



### डॉल्बी नव्हे, सांस्कृतिक कार्यक्रम

मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्याचे वाटप, सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी विशेष उपक्रम अन्य उपक्रम हे डीजे डॉल्बीच्या दणदणाटाशिवाय राबवली जातात. या मंडळातील विविध उपक्रमामध्ये थोरापर्यंत सर्वांचा सहभाग विधायक उपक्रमासाठी हे मंडळ पंचक्रोशीत सर्वश्रुत आहे.

आशयाची फलकही गणपती मंडळाच्या परिसरात लावण्यात आले आहेत. १९९९ साली संगम ग्रुप मित्र मंडळाची स्थापना झाली, मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ ढगे आहेत ते माजी आमदार राजाभाऊ राऊत यांचे मेहुणे आहेत. त्यांच्या संकल्पनेतून संगम ग्रुप या नावाने २०११ साली धर्मादाय कार्यालयाकडे अधिकृत नोंदणी ही करण्यात आली आहे. संगम ग्रुप गणेशोत्सव मंडळाचे समाधान देवराम, सखाराम मिसाळ, विशाल झोरी, नवनाथ मिसाळ, केदार चोबे, बाबासाहेब देवराम, रणजित मिसाळ, उमेश जाधव, प्रदीप देवराम, संतोष काटकर, दादासाहेब दिवटे, पांडुरंग गावकरे हे युवक पुढाकार घेऊन प्रतिवर्षी गणरायाची स्थापना करतात.

# अवैध दारू, जुगार आणि हल्लेखोरांवर पोलिसांचा धडाका

आरंभ मराठी | धाराशिव

दारूबंदी कायदा, जुगारबंदी आणि समाजकंटकांवर अंकुश ठेवण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांनी गेल्या २४ तासांत धडाकेबाज मोहीम हाती घेतली. या मोहिमेत अवैध दारू विक्रेत्यांवर छापे, जुगार अड्ड्यावर धाडसी कारवाई तसेच मारहाणीच्या घटनांवर तत्परतेने गुन्हे नोंदवण्यात आले. जिल्ह्यात वेगवेगळ्या भागांत झालेल्या या घटनांमुळे पोलिसांची कडक भूमिका अधोरेखित झाली आहे.

मुरुम पोलिस ठाण्याच्या हद्दीत काळनिंबाळा शिवारात अनिकेत राठोड (१९, रा. जेजुरी) हा तरुण दारू विक्री करताना रंगेहात पकडला. पोलिसांनी त्याच्याकडून ५ हजार ५२० रुपयांच्या दारूच्या बाटल्या जप्त केल्या. आंबी पोलिसांनी लक्ष्मण गरदडे, हुशेन शेख व बालाजी गटकळ या तिघांना अटक करून २ हजार ८०० रुपयांच्या ४० बाटल्या जप्त केल्या. या सर्वांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे दाखल झाले असून चौकशी सुरू आहे.

धाराशिव शहरातील निंबाळकर गल्लीमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड घालत तब्बल १ लाख ५ हजार रुपयांची रोकड, पत्ते व इतर साहित्य जप्त केले. या कारवाईत सर्फराज कुरेशी, सुनील कुंभार यांच्यासह आठ जणांना अटक करण्यात आली. शहरात काही दिवसांपासून सुरू असलेल्या गुप्त जुगार व्यवसायाला या कारवाईमुळे मोठा आळा बसला आहे.

CMYK

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
संपादकीय
मंगळवार, दि. 2 सप्टेंबर 2025

# आली गौराई सोनं पावली..!

**आनंद**, उत्कर्ष, चैतन्य, भक्तीभावबंधाचा अनोखा महोत्सव म्हणजेच वर्षा ऋतू.. वर्षा ऋतूत निसर्ग संपदेची भरभराट असते. आषाढ.. श्रावण.. भाद्रपद मासात तर दिनदिन उत्सव साजरा होत असतो. आपली संस्कृती निसर्गपूरक पौराणिक वारसा चालविणारी आहे. आपले व्रतवैकल्ये संस्कृतीची अविभाज्य अंगे बनली आहे.पौराणिक संदर्भानुसार भगवान श्रीहरी विष्णू देवशयनी एकादशी पासून तर कार्तिकी देवउठणी एकादशी पर्यंत क्षीरसागरात शेषक्षय्येवर योगनिद्रेस प्रारंभ करतात, त्यांच्या गैरहजेरीत देवाधिदेव भगवान श्री शंकरांकडे सृष्टीचे चक्र सांभाळण्याचे सूत्र प्रदान करतात. या काळात संपूर्ण श्रावण मासात श्री शंकराची उपासना केली जाते. श्रावणानंतर शिव गौरींचे पुत्र विघ्नहर्ता वरदविनायकाचे आगमन घरोघरी होते. तर भाद्रपद शुक्ल अष्टमीला आद्यदेवी पार्वतींचे गौराईच्या रूपाने आराधनेस प्रारंभ होतो. भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्ष अनुराधा नक्षत्रावर गौराई (ज्येष्ठा- कनिष्ठा) चे आगमन होत असते. पुढे सलग तीन दिवस आवाहन, पूजन, महाआरती असा त्रिदिवसीय उपासना विधींचा क्रम मोठ्या श्रद्धेने, भक्तीभावाने नियोजनाने परिपूर्णरित्या साजरा होतो. ही 'गौराई' आपल्या माहेरी माहेरवाशीन म्हणून आलेली असते. गौर वर्णाची म्हणून 'गौराई' नांवलौकीकास आहे. भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षात अनुराधा नक्षत्रावर गौराई (ज्येष्ठा- कनिष्ठा) चे आगमन होत असते. पुढे सलग तीन दिवस आवाहन, पूजन, महाआरती असा त्रि दिवसिय उपासना विधींचा क्रम मोठ्या



श्रद्धेने, भक्ती भावाने साजरा होतो. ही गौराई आपल्या माहेरी माहेरवासीन म्हणून आलेली असते.गौर वर्णाची म्हणून गौराई असे तिला म्हटले जाते. विदर्भात तिला महालक्ष्मी म्हटले जाते.गौराई ही एकटी येत नाही,तर त्या दोघी बहिणी ज्येष्ठा आणि कनिष्ठा आपल्या बाळांसोबत येतात. गौराई गणपतीची आई म्हणजेच पार्वती माता आणि माता लक्ष्मीची मोठी बहीण मानली जाते. माहेरवासीन लेकी प्रमाणेच आनंदाचे तिचे स्वागत होते. तिला सुख मिळावे म्हणून तिची धार्मिक प्रथा रीती रिवाजानुसार सरबराई केली जाते. पौराणिक कथेच्या संदर्भानुसार असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया आपले सौभाग्य अक्षय करण्यासाठी गौरीला शरण येतात. शरण आलेल्या स्त्रियांच्या प्रसादार्थ गौराईंनी स्त्रियांचे रक्षण केले.भाद्रपद शुक्ल सप्तमीला गौराईने असुरांचा संहार करून असुरांच्या भयातून मुक्तता केली. अखंड सौभाग्याच्या अभिलाषेपाई गौराईचा कृपाप्रसाद असाचं कायम राहावा; या श्रद्धा भावाने स्त्रिया गौराईचे व्रत आजही मोठ्या भक्ती भावाने कुटुंबासमावेत करतात. एवढेच नव्हे,तर तिच्या आगमनार्थ स्त्रिया नाचत बागडत गीते सुद्धा म्हणतात..

'' चला गो सयांनो चला गौराई पुजुया...
गौराई पुजुया..गौराई पुजुया.. तिला मानपानं देऊया...
आली गौराई सोनंपावली,अंग भरून लेण ती न्याली...
लेकीबाईंची ती माय माऊली..
देईल ती सुखाची सावली...!



**शशिकांत मधुकर तोटे**
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# फिरुनी नवी जन्मेन मी

**प्रत्येकाचा** जीवनप्रवास हा सुखकर असतोच असे नाही. कारण प्रत्येकाची जीवन जगण्याची कला ही वेगवेगळी असते. जीवन हे अमूल्य आहे. खरंच, जीवन म्हणजे देवाने दिलेले एक मोठं गिफ्टच आहे. मग ते जीवन कसं जगायचं रडत-रडत, कण्हत-कण्हत की आनंदाने आणि समाधानाने हे प्रत्येकाच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टी वर आधारित असते.जीवनात येणारे सुखदुःख हे प्रत्येकाचे वेगवेगळे असतात आणि ते पचवण्याची प्रत्येकाची क्षमता ही वेगळीच असते. कोणी आलेल्या दुःखाला कवटाळून बसते, तर कोणी म्हणून सोडून देते आणि पुढचे पाऊल टाकत राहते. कारण प्रत्येकाच्या जीवनात चढ-उतार येत असतात; फक्त त्यांच्या स्वरूपात व प्रमाणात फरक असतो. पण जीवन जगत असताना एखादी गोष्ट करायची राहिली, किंवा एखादं स्वप्न पूर्ण नाही झालं, तर कधीतरी मनात विचार येतोच की या जन्मात नाही पूर्ण झालं, तर पुढच्या जन्मात तरी व्हावं!

नवी वाट शोधायला,
यशाचे शिखर गाठायला,
स्वप्न सत्यात उतरवायला,
फिरुनी नवी जन्मेन मी

जीवन हे क्षणभंगुर आहे, हे माहीत असूनही प्रत्येकजण मग तो गरीब असो वा श्रीमंत आपापल्या परीने जीवन जगत असतो. जीवनात काहीतरी स्वप्न पाहत असतो. त्याच्या जीवनात राहिलेल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, स्वप्न सत्यात आणण्यासाठी त्याला परत जन्म घ्यावासा वाटतो. त्यातलीच मीया जन्मात झालेल्या चुका, उणीवा भरून काढण्यासाठी तरी देवाने तोच म्हणजे मानवाचाच जन्म पुन्हा द्यावा असे मनोमन वाटते. या जीवनचक्रात ८४ जन्मानंतर मानवजन्म मिळतो, असे मानले जाते. प्राणी आणि मानव यांतला फरक म्हणजे बुद्धी, विचारशक्ती, कार्यक्षमता आणि संवेदना. आज मानवाने बुद्धीचा वापर करून प्रत्येक क्षेत्रात उंच शिखर गाठले आहे. त्याच्याकडे असलेल्या कलागुणांमुळे त्याचे जीवन सफल झालेले दिसते, पण प्रत्येकाचेच असे घडते असे नाही.प्रत्येकाच्या अंगी काहीतरी कला असते. त्या कलेला योग्य वाव मिळाला, विचारशक्तीचा उपयोग केला तरच माणूस शिक्षण, उद्योग किंवा अन्य क्षेत्रात प्रगती करतो. त्यामुळे मानवजात ही इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ मानली जाते. परंतु काही अपवाद असतात. या आयुष्यात नाही मिळालेल्या गोष्टींची जी खंत काही जणांच्या मनात कायम घर करून असते, त्यासाठी तरी मनातून आवाज उठतो फिरुनी नवी जन्मेन मी!पुन्हा जन्म मिळाल्यास माणूस तसाच राहील का? की स्वतःमध्ये बदल घडवण्याची त्याची इच्छा असेल? पुन्हा जन्म मिळाल्यास तो अधिक दयाळू होईल का? की दुर्जन माणूस बदलून सज्जन बनेल? या जन्मामध्ये ज्या नात्यांमध्ये गैरसमज झाले, ती नाती पुन्हा प्रामाणिकपणे जपण्याचा तो प्रयत्न करील का? शेवटी, मानवाला आपल्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवायची इच्छा वाटते, आणि आमूलाग्र बदल होत असतात, हे मानवी जीवनाचे गुपित आहे.मुलावर संस्कार करताना कोणतेच आई-वडील वाईट संस्कार घालण्याचा प्रयत्न करत नाहीत. पण तरीही मूल बिघडले किंवा त्याला आयुष्यात यश मिळाले नाही, तर त्यासाठी जबाबदार फक्त त्याची परिस्थिती असते आई वडील नाही. तरीदेखील आईच्या मनात कुठेतरी पाल चुकचुकते आणि ती विचार करते ''जर पुन्हा जन्म मिळाला, तर याहून चांगले संस्कार मुलाला देऊ, आणि आपल्या मतावर ठाम राहू.''पण खरं सांगू का? आपल्यालाही ठाऊक आहे की हे आयुष्य पुन्हा मिळणे शक्य नाही. तरीही माणूस आशावादी असल्यामुळे आशा बाळगतोच!आणि नाहीच माणसाचा जन्म परत मिळाला तरया जीवनातच भरभरून जगायचं!भूतकाळात अडकून राहायचं नाही,भविष्याची चिंता करायची नाही,वर्तमानात राहून हसत-खेळत जीवन जगायचं!धन्यवाद



**सौ. सारिका देशमुख**
धाराशिव

# मन वढाय वढाय...

**मानवी** मनाचा अभ्यास करण्यासाठी एक स्वतंत्र विषय आहे, तो म्हणजे मानसशास्त्र. यामध्ये मानवी मनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला जातो आणि त्यावरून काही सिद्धांत मांडले जातात.आपलं मन आपल्या ताब्यात का राहत नाही? याचे उत्तर आपल्याला या मानसशास्त्रामध्ये नक्कीच मिळते.

मनाला पकडून किंवा बांधून ठेवता येत नाही. म्हणूनच बहिणाबाई म्हणतात

''मन वढाय वढाय,
उभ्या पीकातलं ढोर
किती हाकला हाकला,
फिरी येतं पिकांवर...''

आपण आपल्या मनाला जी आज्ञा देतो, त्याच्या उलट आपलं मन वागत असतं. एखादा विचार अजिबात करायचा नाही असं आपण ठरवतो, पण तोच विचार हट्टाने आपल्या मनात येऊ लागतो. शुगर वाढली म्हणून डॉक्टरांनी ''गोड खाऊ नका'' असं सांगितलेलं असतं, परंतु उलट मनात सारखं गोड खावंसं वाटत राहतं.एखादी दुःखदायक घटना किंवा अपमानास्पद प्रसंग विसरण्याचा आपण सतत प्रयत्न करतो, पण तो प्रसंग मात्र वारंवार मनामध्ये घोळत राहतो.आपण जीवनात केलेल्या चुका सतत अपराधीपणाची भावना निर्माण करत राहतात.मन इतकं चंचल असतं की अनेक वेळा प्रयत्न करूनही आपल्याला एकाग्रता गाठता येत नाही. झऱ्यातील पाण्याप्रमाणे मनातून सतत विचार पाझरत राहतात. कधी कधी तर इतक्या निर्लज्ज वाईट कुकल्पना मनात येतात की आपल्याला स्वतःचीच घृणा वाटू लागते.''मी असा कसा विचार करू शकतो?'' असं वाटून स्वतःच्याच मनावर राग येतो.म्हणूनच बहिणाबाई त्याच कवितेत म्हणतात ''मन जह्यरी जह्यरी, याचं न्यारं रे तंतर अरे, इचू साप बरा, त्याले उतारे मंतर!'' खरं तर मनाची तटस्थता गाठणे म्हणजे मानसिकदृष्ट्या सक्षम, खंबीर होणं होय.एखाद्या घटनेनंतर, संपर्कात येणाऱ्या व्यक्तींच्या आचरणाबाबत अथवा स्वतःच्या दैनंदिन व्यवहारात जेव्हा आपलं मन तटस्थपणे विचार करू लागतं, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण स्वतःच्या मनावर राज्य करू लागतो. पूर्वग्रह, भावना आणि मनातील लालसा यामुळेच आपल्या विचारांमध्ये कलुषता निर्माण होत असते.मनात निर्माण होणारे विविध तरंग, भावना आणि क्लेश यावर नियंत्रण मिळवणं शक्य आहे ा?मनामध्ये एखाद्याबद्दल तीव्र द्वेष भावना निर्माण होते, राग येतो, आकर्षण वाटू लागतं.या सर्वांचं पृथक्करण करता करता आपण कित्येक वेळा दमून जातो.आपल्या स्वतःच्या मनाची खोली आपण मोजू शकत नाही.मन खूप शक्तिशाली आहे यात शंका नाही.मन हे स्मृती आणि बुद्धीपेक्षा वेगळं आहे.मन विचार निर्माण करतं, बुद्धी या विचारांमध्ये फरक करते आणि स्मृती आठवणी जपून ठेवते.स्वामी विवेकानंद यांनी सुदृढ शरीराबरोबरच सुदृढ मन हे सर्व मानवी विकासाचे महत्वाचे तत्त्व मानले आहे.भारतीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने मनाचा अभ्यास योगतत्त्वज्ञानात स्पष्ट होतो.मनुष्य केवळ इंद्रियसुखाचाच विचार करत नाही, तर काही कालांतराने तो मानसिक सुखाच्या गूढ विचारात मग्न होतो.एखादी व्यक्ती गुन्हेगार होते, तेव्हा त्याचे कारण हे त्याची इंद्रिये त्याच्या ताब्यात नाहीत म्हणून नसते; तर त्याचे मन ताब्यात नसल्यामुळे तो गुन्हेगार बनतो.स्वतःच्या मनातील प्रबळ प्रवृत्तीनुसार त्याला वागावे लागते.व्यक्तीच्या कर्माला त्याच्या स्वभावसिद्ध इच्छाच कारणीभूत ठरतात.मानसशास्त्र हेच आपल्या बेताल भटकणाऱ्या मनाला आवर घालण्यास आणि इच्छाशक्ती ताब्यात ठेवण्यास शिकवते. म्हणूनच मानसशास्त्र हे सर्वश्रेष्ठ शास्त्र आहे.त्याचबरोबर मनाची एकाग्रता ही सर्व यशाचे मूळ कारण आहे.मनुष्य आणि पशुत यामधील भेद हाच आहे की, मनुष्याची एकाग्रता अधिक प्रमाणात असते.मनाची एकाग्रता वाढवायची असेल तर मनाचे नियमन करावेच लागते.स्वामी विवेकानंद यांनी मनाच्या एकाग्रतेबरोबरच एखाद्या विषयावरून आपल्या इच्छेनुसार मन काढता येणे हेही तितकेच महत्वाचे मानले आहे.सर्व समस्यांचे मूळ हे मानवी मनाचे असंतुलन होय.प्राणायामासारख्या साधनांनी मन संतुलित करता येते, हे भारतीय तत्त्वज्ञानाने सिद्ध केले आहे.बेताल व चंचल मन सदैव आपल्याला खाली खेचतं, म्हणून नियंत्रित मन फार महत्वाचं आहे.याचाच अभ्यास मानसशास्त्रात केला जातो.व्यक्तीच्या जीवनात मानसशास्त्राला अनन्यसाधारण महत्व आहे.



**किशोर जाधव**
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

# दिव्याखाली अंधार आणि बुडत्याला काडीचा आधार

**मराठी** भाषेत अनेक सुप्रसिद्ध म्हणी आहेत.ह्या म्हणी अतिशय मार्मिक,खोचक आणि महत्त्वपूर्ण संदेश देतात.ज्या म्हणीचा अर्थबोध कळतो ती म्हण कायम लक्षात राहते.अशा कितीतरी म्हणी आहेत ज्या मानवी जीवनाशी निगडित आहेत आणि ह्या म्हणी मानवी जीवनातील अनेक अडचणी,प्रश्न चुटकीसरशी सोडवतात आणि कठीण परिस्थितीवर सहजतेने मात करायला शिकवतात.म्हणून फार पुर्वीपासून मानवी जीवनात विविध आणि अर्थपूर्ण म्हणींचे स्थान अबाधित व महत्वपूर्ण आहे. एकेका म्हणीचा अर्थ समजून घेऊ लागलो की त्या म्हणी कायम लक्षात राहतात. म्हणींमुळे आपल्या मराठी भाषेचे सौंदर्य वाढते. आम्ही भावंड लहान होतो तेव्हा अभ्यास करताना माझी आजी पार्वतीबाई आमच्या सोबत असायची.ती आम्हाला अनेक म्हणी व त्यांचा अर्थ समजावून सांगायची.मग आम्ही एकाग्रतेने अभ्यास करायचो.अचानक लाईट गेली की बाकीचे झोपी जायचे.मी मात्र घासलेट म्हणजे रॉकेलचा दिवा पेटवायचो आणि अभ्यास करायचो.दिवा पेटवल्यानंतर तो दिवा उचलून दुसरीकडे ठेवताना लक्षात आले की खरोखर दिव्याखाली अंधार असतो. पेटता दिवा इतरांना प्रकाश देतो,हा दिवा इतरांचे जीवन प्रकाशमय करतो परंतु,त्याच्याखालचा अंधार तो कधीच नष्ट करू शकत नाही.तसेच प्रसिध्द व ख्यातनाम व्यक्तींमध्ये सुध्दा एखादा दोष असतो एखादी उणीव असते.या जगात परिपूर्ण असा कोणीही नाही.दुसरी आणखी एक म्हण आहे 'बुडत्याला काडीचा आधार'.या म्हणीचा अर्थ प्रत्यक्षात मी एकदा अनुभवला आहे.शाळेला उन्हाळी सुट्टी लागली की आम्ही आमराईत आंबे राखायला जायचो. दुपारी जवळच्या विहिरीत उतरून थंड पाणी प्यायचो.एके दिवशी पाणी पिताना लक्षात आले की एक मुंगी पाण्यात पडली आहे आणि ती पाण्यात बुडण्यापासून स्वतःला वाचवत आहे.हे लक्षात येताच मी जवळची एक गवताची काडी घेतली आणि ती गवताची काडी मुंगी जवळ धरली.ती मुंगी लगेचच त्या काडीवर चढली.ते पाहून मला ती म्हण लगेच लख्खपणे आठवली ,बुडत्याला काडीचा आधार.याचा अर्थ असा होतो की संकटात किंवा अत्यंत कठीण परिस्थितीत सापडलेल्या व्यक्तीला छोटीशी केलेली मदत सुध्दा उपयोगाची ठरते.ती लहान मदत सुध्दा त्याला खूप मोठी वाटते. परंतु,आजकाल अशी मदत करण्याची तयारी कोणी दाखवत नाही.कारण आपण सगळे स्वार्थाच्या कचाट्यात अडकलो आहोत. मराठीत अशा अनेक म्हणी आहेत ज्या आजच्या काळाला ही तंतोतंत लागू पडतात.काही लोकांचे आडवेतिडवे स्वभाव पाहिले,असभ्य भाषा व असभ्य वर्तन पाहिले की त्यांना म्हणीच्या रुपात टोमणे मारावे वाटतात.काही वाईट लोकांना कितीही चांगले वागायला व चांगले बोलायला सांगितले तरीही ते कोणाचे ऐकून घेत नाहीत.आणि आपल्या स्वभावात बदल करत नाहीत. म्हणून अशावेळी एक म्हण लगेच आठवते- 'कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरीही ते वाकडे ते वाकडेच राहते'.याचा अर्थ असा होतो की काही लोक आपला मूळ स्वभाव कधीच बदलायला तयार होत नाहीत. आजकाल लोक इतके स्वार्थी झाले आहेत की जर तुमच्याकडे एखादे काम असेल तर तुमच्याशी फार गोड बोलतात. आणि तुम्ही त्यांचे काम पूर्ण केल्यानंतर मात्र ते तुमची ओळखही विसरून जातात. अशा लोकांसाठी 'कामापुरता मामा आणि ताकापुरती आजी' ही म्हण प्रचलित झाली आहे.तसेच 'गरज सरो आणि वैद्य मरो' ही म्हण त्या लोकांसाठी आहे जे एखाद्याने केलेल्या उपकाराची जाणीव ठेवत नाहीत. अडचणीच्या काळात ज्यांनी मदत केली त्याची आठवण ठेवत नाहीत.ही अतिशय घाणेरडी सवय आजच्या स्वार्थी लोकांमध्ये रूढ झाली आहे. आजच्या घडीला काही लोक स्वतःला फार शहाणा समजतात. त्यांच्यापेक्षा शहाणा या जगात दुसरा कोणी नाही असा त्यांचा गोड गैरसमज असतो. ते चारचौघांत स्व कर्तृत्वाच्या नुसत्या बढाया मारतात.प्रत्यक्षात मात्र काहीच करत नाहीत.त्यांना त्यांच्या शहाणपणाचा गर्व झालेला असतो. पण या भ्रमात राहून ते जेव्हा त्यांचे स्वतःचे काम स्वतःच्या कर्तृत्वाने स्वतः करू शकत नाहीत तेव्हा त्यांच्या साठी काही म्हणी तंतोतंत लागू पडतात.अति शहाणा त्याचा बैल रिकामा,गर्वाचे घर खाली आणि उथळ पाण्याला खळखळाट फार या तीन म्हणी दीड शहाण्या लोकांकडे पाहून आल्या आहेत असे वाटते.काही लोक आपले उत्पन्न लक्षात न घेता वारेमाप खर्च करतात.कधी कर्ज काढतात आणि सण उत्सव दणक्यात साजरे करतात.त्यामुळे कर्ज वेळेवर फेडता येत नाही.चक्रवाढ व्याजाच्या चक्रव्यूहात रुतून बसावे लागते.कर्जाचा डोंगर वाढत जातो.हताश आणि निराश व्हावे लागते.अशा लोकांनी,'अंथरुण पाहून पाय पसरावे' ही म्हण कायम लक्षात ठेवावी. अनाठायी व बिन कामाचा खर्च करू नये. व्यसनी लोकांच्या संगतीत राहिल्यास माणूस व्यसनी बनतो.एकदा एखादे व्यसन जडले की जीवनाचा सत्यानाश झाल्याशिवाय ते सुटत नाही.अशा लोकांसाठी ह्या दोन म्हणी फीट बसतात.ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला वाण नाही पण गुण लागला आणि जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. आजच्या आधुनिक काळात बरेच आईवडील बारशाला आपल्या लहान मुलांमुलींचे नामकरण करताना मनात आले ती नावे ठेवतात.त्या नावाचा अर्थ व आपल्या बाळाचा स्वभाव हे लक्षात न घेता आधुनिक नावे ठेवतात.नाव भारी भारी ठेवतात पण ते मुलगा व मुलगी त्या नावाला साजेसे वर्तन करत नाहीत,नावाला साजेसे कर्तृत्व करत नाहीत.अशा लोकांना 'नाव सोनुबाई आणि हाती कथीलाचा वाळा' ही म्हण योग्य वेळी आठवली तर फार बरे होईल. आपण पहातो की काही लोक भ्रष्टाचार करून व अफरातफर करून अमाप पैसा कमावतात.पण हा पैसा पचनी पडत नाही.असा हरामाचा पैसा कमावणाऱ्या लोकांना कोणतीतरी मोठी व्याधी जडते.तिच्या उपचारात घपळा करुन मिळवलेला सगळा पैसा खर्च होतो.अशा लोकांना म्हणीच्या रुपात संदेश द्यावा वाटतो की 'हपापाचा माल गपापा' किंवा 'जसे कराल तसे भराल!' आणखी अशा अनेक म्हणी आहेत ज्यांनी मनुष्य जीवनातील सत्यता विषद केली आहे.ह्या म्हणी खूप आहेत पण तुर्तास आजच्या लेखात एवढ्या म्हणी पुरेशा आहेत. बाकीच्या म्हणी तुम्ही आठवा आणि त्यांचा अर्थ समजून घ्या. त्या म्हणी ऐकून एक विलक्षण आनंद मिळतो एवढे मात्र नक्की!



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो. ९७३०९३९७३२.

# तुमच्या जीवपेक्षा या जगात मौल्यवान काहीच नाही

**अश्मयुगीन** काळात अन्न मिळविणे आणि प्रजनन करणं एवढ्यापुरतेच माणसाचे जगणं मर्यादित होते. आज माणसाची जगण्याची परिभाषा बदलली आहे.वाढत्या अपेक्षा आणि हव्यास यामुळे जगणं पार बदलून गेलं आहे. माणसाला पैसा, प्रतिष्ठा आणि प्रसिद्धी हवी आहे.त्यासाठी माणसाची सतत धावपळ सुरू आहे. कोणतेही काम करताना अथवा जबाबदारी स्वीकारताना आपल्या जीवाचा विचार करावा.समाजात आपण पाहतो नावासाठी,प्रसिद्धीसाठी माणसं जीवाचा आटापिटा करतात. आपल्याला जेवढे शक्य आहे ,आपली जेवढी क्षमता आहे तेवढे काम मनापासून, प्रामाणिकपणे आणि आनंदाने करावे.अतिरिक्त जबाबदारी घेऊन माणसे स्वतःच्या जीवाचे हाल करून घेतात. तुम्ही आणि तुमचा जीव कुटुंबासाठी महत्वाचा आहे.तुमच्यावर तुमचे कुटुंब अवलंबून आहे तुम्ही कुटुंबाचे आधार आहात.उगीच कुणीतरी चांगले म्हणते, कौतुक करते म्हणून आपल्या आरोग्याचा विचार न करता न पेलणारी जबाबदारी घेऊ नये.यामुळे तुमचे मानसिक स्वास्थ बिघडते. तुम्ही ताण तणावात जगता.कधीकधी मोठे आजारपण सुरु होते.त्याचा तुम्हालाही आणि कुटुंबाला प्रचंड त्रास होतो.वरिष्ठांची मर्जी किंवा विश्वास संपादन करणं,बढती,पगारातील वाढ, माझे नाव यासाठी माणसे प्रचंड असे कामाचे ओझे घेतात.आपल्याला सोपवलेले काम निष्ठेने आणि कर्तव्य भावनेने करावे.त्यात नीटनेटकेपणा आणि चोखपणा असावा.त्या कामात कुचराई करता कामा नये. काम करताना सहकार्याची भावना असावी.एकमेकांना सहकार्य जरुर करावे.परंतु तेही एका मर्यादेपर्यंतच. कामाचे सगळेच ओझे आपल्यावर घेण्याची आवश्यकता नसते.काही गोष्टी बाबत स्वतः ला मर्यादा घालून घ्यायला हव्यात.तुम्ही सतत कामाच्या ओझ्याखाली दडपणात राहता.वैयक्तिक आनंद मिळत नाही. मित्रांना व कुटुंबाला वेळ देण्यात अडचणी येतात.आपल्या कामाबरोबर, कुटुंब, मित्रपरिवार, नातेवाईक, स्वतः चे छंद यांना पुरेसा वेळ द्यायला पाहिजे.तरच जगण्याचा आनंद घेता येईल.काळ कोणासाठी थांबत नाही.अशी एक वेळ येते की माझे हे करायचे राहून गेले,माझे ते करायचे राहून गेले अशी खंत मनाला वाटू नये. यासाठी त्या-त्या वेळी त्या-त्या गोष्टीचा आनंद घेत आयुष्य जगण्यात खरी मजा आहे. स्वतः साठी आणि आपले छंद जोपासण्यासाठी वेळ काढला पाहिजे.छंद ताणतणाव हलका करायला आणि आनंदी जगायला खूप उपयोगी पडतात.प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा ही माणसाची भूक न भागविणारी व्यसने आहेत. त्याच्या किती आहारी जायचं हे माणसाला ठरवता आलं पाहिजे. आर्थिक नियोजन करुन आपले खर्च आटोपशीर ठेवायला हवेत. आपल्या गरजांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार खर्च करायला हवेत.नियोजन नसेल तर मग आर्थिक अडचणी निर्माण होतात.

**लक्ष्मण जगताप**
बारामती

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संमिश्र
मंगळवार, दि. 2 सप्टेंबर 2025

# आदर्श उपक्रम:गणेशोत्सवासाठी जमलेली वर्गणी आंदोलनकर्त्यांच्या पोटापाण्यासाठी

## मोहा व परिसरातील गावांचा मराठा आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### मुंबईतील उपोषणाला अन्नऔषधांचा पुरवठा

### गाव बंद, वर्गणीचा त्याग, औषधांची मदत मोहा परिसरातून मुंबईत आंदोलकांना पाठबळ



हर्षवर्धन मडके | आरंभ मराठी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील मुंबईतील आझाद मैदानावर गेल्या तीन दिवसांपासून उपोषण करत आहेत. या आंदोलनाला ग्रामीण भागातून मोठा प्रतिसाद मिळत असून कळंब तालुक्यातील मोहा, बरमाचीवाडी, तडवळे, सातेफळ, नागझरवाडी, खाम सवाडी, हळदगाव या गावांनी एकजुटीचे दर्शन घडवत गाव बंद ठेवले. मुंबईला आंदोलक म्हणून निघून गेलेले युवकशेतकरी आपल्या बांधवांसोबत ठाम उभे आहेत, तर गावात थांबलेल्या युवकांनी अन्न, पाणी, औषधांचा पुरवठा अखंड सुरू राहावा यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत.



### गाव बंदचा ठोस निर्णय

मोहा व परिसरातील बरमाचीवाडी, तडवळे, सातेफळ, नागझरवाडी, खाम सवाडी, हळदगाव ही गावे आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. दुकाने, बाजारपेठा बंद ठेवून ग्रामस्थांनी सरकारला ठोस संदेश दिला की ''आरक्षण मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहणार.''

### गणेशोत्सवाची वर्गणी आंदोलनासाठी

मोहा येथील स्वराज्य गणेश मंडळाने ऐतिहासिक निर्णय घेतला. मिरवणुकीसाठी लावलेला डीजे रद्द करून गणेशोत्सवासाठी जमवलेली वर्गणी आंदोलनासाठी अन्नसामग्री खरेदीसाठी वापरली. या उपक्रमामुळे गावकऱ्यांनी मंडळाचा सत्कार केला. ग्रामस्थांनी म्हटले, ''हा उपक्रम पुढील पिढ्यांसाठी आदर्श आहे.''

### अन्नसाहित्याचा लोकसहभाग

ग्रामस्थांनी आपल्या घरातून भाकरी, चटणी, लोणचे, फरसाण, पाणी बाटल्या गोळा केल्या. गाडीभरून भरलेले साहित्य थेट मुंबईच्या दिशेने रवाना करण्यात आले. ''आंदोलनकर्त्यांचा पोटापाण्याचा प्रश्न कधीच निर्माण होणार नाही, याची जबाबदारी गावकरी स्वतः घेत आहेत,'' असे गावकऱ्यांनी सांगितले.

### औषधोपचारांची मदत

मोहेकर मेडिकलचे मालक विकास मडके यांनी सामाजिक जबाबदारी पार पाडत आंदोलनकर्त्यांना मोफत औषधे दिली. मुंबईला गेलेल्या बांधवांना प्राथमिक उपचारांसाठी औषधसामग्रीचा पुरवठा करण्यात आला. ''अडचणीच्या काळात गावकऱ्यांसोबत उभे राहणे ही आपली कर्तव्यभावना आहे,'' असे मडके यांनी सांगितले.

### गावातले युवक सज्ज

मुंबईला गेलेले बांधव आंदोलन करत असताना गावात थांबलेल्या युवकांनीही हातभार लावला आहे. कोणी अन्नधान्य गोळा करत आहे, कोणी पाण्याचा पुरवठा पाहत आहे, तर कोणी औषधे पोचवण्याची जबाबदारी घेतली आहे. ''गावकऱ्यांच्या पाठबळामुळे मुंबईतील आमचे बांधव निर्धास्तपणे आंदोलन करू शकतात,'' असे गावातील तरुणांनी सांगितले.

# रुक्मिणी फांउडेशन तर्फे डॉ ऐश्वर्या साळुंके यांचा सत्कार

आरंभ मराठी | काटी

तुळजापूर तालुक्यातील काटी येथील ऐश्वर्या त्रिगुणशिल साळुंके हिने शालेय शिक्षण सोलापूर येथील सेवासदन हायस्कूलमध्ये पुर्ण केले तर महाविद्यालयीन शिक्षण दयानंद महाविद्यालय सोलापूर येथे पुर्ण केले.तर वैद्यकीय शिक्षणासाठी तिला रशियाला पाठविण्यात आले.तिने प्रतिकूल परिस्थितीही,जिद्द आणि चिकाटीने अभ्यास करुन रशियातील कुबान विद्यापीठातून एमबीबीएस चे शिक्षण पुर्ण केले.त्यानंतर भारतातील अतिशय कठीण समजली जाणारी फॉरेन मेडिकल ग्रॅंज्युएट एक्झामिनेशन FMGE परिक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली आहे. ऐश्वर्या साळुंके हिस तिचे चुलते सुभाष साळुंके व डॉ.शिवाजी साळुंके यांचे उत्तम मार्गदर्शन मिळाले.ऐश्वर्या साळुंके यांच्या या घवघवीत यशाबद्दल काटी येथील रूक्मिणी फांउडेशन च्यावतीने मान्यवरांचे हस्ते त्यांचा शाल,पुष्पहार देऊन सत्कार करुण पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुजित हंगरगेकर,रूक्मिणी फांउडेशनचे सचिव प्रा.अभिमान हंगरगेकर,जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे मा व्हाईस चेअरमन अनिल हंगरगेकर,माजी सरपंच शामराव आगलावे,त्रिगुणशिल साळुंके,ऐश्वर्या साळुंके,आजोबा भागवत साळुंके,आर्यन हंगरकर व साळुंके परिवार उपस्थित होते.ऐश्वर्याने वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस पदवी मिळविल्याबद्दल काटीसह परिसरातून तिचे कौतुक केले जात आहे.

# शिराढोण येथे पर्युषण महापर्व उत्साहात

**शिराढोण:**–शिराढोण (ता. कळंब) येथील श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिराच्या वतीने पर्युषण महापर्वनिमित्ताने २८ ऑगस्ट २०२५ ते ७ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महापर्वात दररोज अभिषेक, पूजन, विधान, स्वाध्याय, प्रवचन तसेच पाठशाळा अशा धार्मिक उपक्रमांबरोबरच भक्तिमय वातावरणात सकल जैन समाज सक्रिय सहभागी होणार आहे. या कालावधीत मध्यप्रदेश येथील प्रख्यात वक्ते श्री पियूष शास्त्री यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. धार्मिक उपक्रमांबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार असून त्यामध्ये संगीत खुर्ची, जिनवाणी सजावट, हाँ को ना और ना को हाँ स्पर्धा, अष्टद्रव्य थाळी सजावट, सापशिडी आदी मनोरंजनात्मक व ज्ञानवर्धक उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. दसलक्षण महापर्वाच्या दैनिक कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी सकल जैन समाज, सन्मती महिला मंडळ, अखिल दिगंबर जैन सैतवाल संस्था तसेच मंदिर व्यवस्थापन समिती एकत्रित परिश्रम घेत आहेत.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त धावण्याची स्पर्धा

आरंभ मराठी | तुळजापूर




यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्ताने १००/२०० मीटर रनिंग स्पर्धेचे आयोजित करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव उल्हास बोरगांवकर यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून हिरवा झेंडा दाखवत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रवीण भाले यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. नागनाथ कदम यांनी केले.१०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अक्षय धोत्रे, द्वितीय रेहान सिद्दिकी, तृतीय शिवरत्न जाधव, १०० मीटर धावणे मुली या गटात प्रथम प्रेमा माने, द्वितीय धरती नरवडे तृतीय श्रद्धा राठोड, दोनशे मीटर धावणे मुले गट प्रथम मोहन सिरसठ, द्वितीय शिवरत्न जाधव, तृतीय सुरज माळी, २०० मीटर धावणे मुली गटात प्रथम नम्रता माने द्वितीय श्रावणी निचळ तृतीय दिव्या नाईकवाडी या विद्यार्थ्यांना संस्थेचे सचिव उल्हास बोरगांवकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, उपप्राचार्य डॉ. प्रवीण भाले, उपप्राचार्य प्रा. रमेश नन्नवरे, क्रीडा प्रमुख डॉ. अशोक कांबळे, प्रा. डॉ. अनिल शित्रे, प्रा. डॉ. गोविंद काळे, डॉ. मनोज झाडे, रा. से. यो. प्रमुख प्रा. राजेश बोपलकर, डॉ. नागनाथ कदम, प्रा. स्नेहा ठाकूर, डॉ. विनयकुमार चौधरी, डॉ. अंबादास बिराजदार, डॉ. प्रशांत अमृतराव, डॉ. शिवाजी जेटिथोर, डॉ. मंदार गायकवाड, डॉ. आमोद जोशी, डॉ. अजय मुंढे, डॉ. धर्मराज पवार इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग यावेळी उपस्थित होते.

# जवळा-सिरसाव परिसरात मुसळधार पावसाने उभ्या पिकांचे मोठे नुकसान



आरंभ मराठी | जवळा

परंडा तालुक्यातील निजाम जवळा आणि सिरसाव परिसरात गेल्या दहा–बारा दिवसांपासून झालेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पावसामुळे तूर, कापूस, सोयाबीन, उडीद, मूग, कांदा आणि मका या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. तूर पिके पूर्णपणे ओंबाळून गेली असून पाला झडून गेला आहे. तर सोयाबीन, उडीद, मूग, मका आणि कापूस पिके पिवळसर पडून शेतकऱ्यांच्या आशा उध्वस्त झाल्या आहेत. त्यामुळे परिसरातील शेतकरी मोठ्या चिंतेत सापडले आहेत.या सततच्या मुसळधार पावसाने उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी सरकारकडे कोणत्याही अटी–नियमांशिवाय सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी जोर धरत आहे.

# मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला सकल मराठा भगिनींचा ठाम पाठींबा

आरंभ मराठी | धाराशिव



मराठा आरक्षणाच्या न्याय्य मागणीसाठी मुंबईत मनोज जरांगे पाटील यांनी हाती घेतलेल्या उपोषणाला आता समाजातील मातृहृदयाचा पाठींबा मिळत आहे. सकल मराठा भगिनींनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला.गेल्या कित्येक दशकांपासून आरक्षणासाठी समाजात संघर्ष सुरू आहे. पिढ्यान् पिढ्या घाम गाळूनही हक्काचा न्याय मिळत नाही, ही वेदना प्रत्येक मराठा कुटुंबाच्या मनात घर करून आहे. जरांगे पाटील यांनी शांततेच्या आणि लोकशाही मार्गाने सुरू केलेले आंदोलन हे समाजाच्या न्याय्य हक्कासाठीचे अंतिम पाऊल आहे, असे मत निवेदनात व्यक्त करण्यात आले. शासनाने यावर वेळ न घालवता तातडीने सकारात्मक तोडगा काढावा, अशी आर्त मागणीही करण्यात आली.मुंबईत लाखो आंदोलनकर्ते जमले असून त्यांच्या पिण्याच्या पाण्यापासून ते स्वच्छतागृह, वैद्यकीय मदत आणि सुरक्षेपर्यंत सर्व सोयी–सुविधांची व्यवस्था करणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्याचबरोबर आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पुरेशी सुरक्षा द्यावी आणि मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर शासनाने सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा, अशी मागणी ठामपणे मांडण्यात आली.या निवेदनावर सौ. अलका हनुमंत गोरखर, सौ. किरण परशुराम निंबाळकर, माया सखाराम चव्हाण, सौ. पूजा पाटील, सौ. अलका प्रकाश मगर, देवकन्या गाडे, सौ. शशिकला सुरेश पाटील, कांचन किरण भंडारे, शारदा वसंत कोल्हाल, चिमणा ताई भीमराव जाधव आणि श्रीमती शालिनी सुभाषराव सुरवसे यांसह अकरा भगिनींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# निसर्गोपचार तज्ञ स्वागत तोडकर यांचा सत्कार



आरंभ मराठी | तुळजापूर

सुप्रसिद्ध निसर्गोपचार तज्ञ स्वागत तोडकर यांनी रविवारी श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले.दर्शनानंतर तुळजाभवानी मंदिर प्रशासकीय कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, बाळासाहेब शिंदे, सिद्धीनाथ रोचकरी, श्रीनाथ शिंदे, विश्वासराव चव्हाण, रोहित चव्हाण, प्रशांत अपराध, आनंद कंदले, समर्थ पैलवान आदी उपस्थित होते.

# प्राचार्य के.वाय.इंगळे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ

आरंभ मराठी | तुळजापूर




जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य के वाय इंगळे ३४ वर्षाची सेवा करून सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने नवोदय परिवार, मित्रमंडळी, नातलग, पालक यांच्यावतीने सेवापूर्ती गौरव समारंभ घेण्यात आला.याप्रसंगी प्राचार्य के वाय इंगळे यांनी बालपणापासून आतापर्यंत घेतलेले शिक्षण तसेच शिक्षकपदापासून प्राचार्य पदापर्यंत हा प्रवास त्यांनी लातूर, कोल्हापूर, गोवा, आसाम, रायगड, तुळजापूर कशा पद्धतीने झाला याचा आलेख सांगितला. त्यानंतर एस एस माने, एस डी खोबरागडे ,एम पी कुलकर्णी, डी एन माने, सी एस गोमारे, व्ही व्ही कुलकर्णी, डॉ.रामेश्वर यादव, शिवाजी साखरे ,आर् के शुक्ला, सुनीता वाघमारे, डी एस देशमुख, धनंजय उंबरकर ,विद्यार्थी प्रथमेश स्वामी, आदिती जमाले उपप्राचार्य डी व्ही बडे यांनी के वाय इंगळे यांच्या कार्याचा गौरव त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना भावी जीवन आरोग्यमय, सुखमय , आनंदमय जावो अशा प्रकारच्या शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी सपत्नीक चांदीची वस्तू व पूर्ण पोशाख देऊन सन्मान करण्यात आला .याप्रसंगी प्राचार्य के वाय इंगळे म्हणाले की, ३४ वर्षे मी शिक्षक पेशापासून ते प्राचार्य पदापर्यंत प्रामाणिकपणे कार्य केल्यामुळे आमचे सर्व कुटुंब सुखी व समाधानी आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले.

# सभागृह बांधकामासाठी ग्रामविकास मंत्र्यांकडे शिराढोण ग्रामपंचायतीकडून निधीची मागणी

आरंभ मराठी | शिराढोण



शिराढोण (ता. कळंब) ग्रामपंचायततर्फे गावातील नागनाथ महाराज मठ येथे सभागृह उभारण्यासाठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करून द्यावा, अशी मागणी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे करण्यात आली आहे. ग्रामपंचायत सरपंच लक्ष्मीताई म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत प्रतिनिधींनी मंत्र्यांना निवेदन सादर केले. यावेळी माजी ग्रामपंचायत सदस्य पवन दिलीप म्हेत्रे (जिल्हाचिटणीस, भाजयुमो, जिल्हा धाराशिव), तसेच दिपक माळी, उत्तम बालटे व रवी गोरे उपस्थित होते. गावातील नागनाथ महाराज हे माळी समाजाचे प्रमुख श्रद्धास्थान असून दरवर्षी हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी स्वतंत्र सभागृहाची सोय नसल्याने अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात सांगितले आहे.

## आरंभ मराठी श्रीकृष्ण गणेश मंडळाच्या देखाव्याचे मान्यवरांच्या उद्घाटन

# ऑपरेशन सिंदूर देखाव्याला मान्यवरांची दाद; मंडळाच्या उपक्रमांचे पोलीस निरीक्षक दराडे यांच्याकडून कौतुक

आरंभ मराठी | धाराशिव






शहरातील गवळीवाडा येथील श्रीकृष्ण गणेश मंडळाने यावर्षी भारतीय सैन्याच्या शौर्य आणि पराक्रमाचे दर्शन घडवणारा ऑपरेशन सिंदूर हा साकारला असून,देखाव्याचे उद्घाटन आणि श्री गणेशाची आरती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांच्या हस्ते करण्यात आली.या प्रसंगी बोलताना निरीक्षक दराडे म्हणाले की, श्रीकृष्ण गणेश मंडळ दरवर्षी समाजाला विचार करायला लावणारे आणि प्रेरणा देणारे देखावे सादर करत असते. यंदा 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारतीय सैनिकांचे शौर्य जनतेसमोर मांडले आहे. तरुण पिढीला देशसेवेची प्रेरणा यामुळे मिळेल. तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला मंडळाने उपक्रम घ्यावा,असे उपक्रम अभ्यासाची आवड निर्माण करण्यास उपयुक्त ठरतील. गुणवंतांचा सन्मान हा विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी प्रेरणादायी ठरेल.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खोखो असोसिएशनचे राष्ट्रीय सहसचिव न प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, दैनिक आरंभ मराठीचे संपादक चंद्रसेन देशमुख, पत्रकार अभिमान हंगरगेकर, किशोर माळी, मल्लिकार्जुन सोनवणे तसेच किरण कांबळे उपस्थित होते.संपादक चंद्रसेन देशमुख यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, श्रीकृष्ण गणेश मंडळ केवळ उत्सव काळातच नव्हे तर वर्षभर सामाजिक भान जागृत ठेवणारे उपक्रम राबवते. स्थापनेपासून मंडळाने घेतलेल्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना कायमच बक्षिसे आणि गौरव मिळत आलेला आहे. यंदाचा देखावा आणि माहिती पुस्तिकाही समाजप्रबोधनाचीच दिशा आहे.कार्यक्रमात खो–खो प्रशिक्षक व शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रविण बागल, प्रशिक्षक प्रभाकर काळे तसेच पोलीस हवालदार दिपक लाव्हरे–पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय दहावी–बारावी उत्तीर्ण, शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षेत मेरिटमध्ये आलेले एकूण २५ विद्यार्थी व खेळाडू यांचा शालेय साहित्य देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष शितल देशमुख, उपाध्यक्ष अभिषेक (नाना) बागल यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुरेश गवळी यांनी केले.

# ट्रॅव्हल्सकडून अवाजवी तिकीट दर,प्रवाशांची लूट

## कारवाई करा,अन्यथा आंदोलन करणार,छावा संघटनेचा इशारा




आरंभ मराठी | धाराशिव

शहरासह जिल्ह्यात खासगी ट्रॅव्हल्सकडून प्रवाशांची उघड लूट सुरू असून प्रवाशांकडून मनमानी तिकिटदर आकारले जात आहेत. या अन्यायाविरोधात छावा संघटना आक्रमक झाली आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) यांना निवेदन देऊन संघटनेकडून तातडीने कठोर कारवाईची मागणी करण्यात आली असून, कारवाई झाली नाही तर छावा संघटना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनात छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. राकेश पवार यांनी म्हटले आहे की, जादा भाडे वसूल करणाऱ्या ट्रॅव्हल्सने प्रवाशांची लूट थांबवावी. महाराष्ट्र मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करून चालणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करून ती वाहने ताबडतोब जप्त करावीत. विमा व फिटनेस नसलेली वाहने रस्त्यावर धावत असणे धोकादायक असून, अशा गाड्यांमुळे अपघात झाल्यास जबाबदारी प्रशासनाची असेल. ड्रायव्हिंग लायसन्स नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांवर गुन्हे दाखल करावेत आणि प्रवाशांच्या तक्रारींसाठी आरटीओ हेल्पलाईन तत्काळ सुरू ठेवावी, अशी मागणी करण्यात आली.हे निवेदन छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. राकेश पवार यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
आपलं धाराशिव
मंगळवार, दि. 2 सप्टेंबर 2025

# दाभा गाव विकासाच्या प्रतीक्षेत; दाभा पाटी ते गाव खड्डेमय रत्यामुळे विकासापासून वंचित

**आरंभ मराठी | शिराढोण**

कळंब तालुक्यातील दाभा गाव हे कळंबलातूर मुख्य रस्त्यावरून अवघ्या तीन किलोमीटरवर असून, सुपीक जमीन, शेतीप्रधान उत्पन्न आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकसंख्या ही गावाची ओळख आहे. तरीदेखील, मूलभूत सोयीसुविधांचा घोर अभाव असल्याने गावकरी आजही विकासापासून वंचित आहेत.दाभा गावातून वाहतूक व्यवस्थेचा कायम कोलम डलेला कणा दिसून येतो.गावापर्यंत येण्यासाठी एसटी बससेवा उपलब्ध नाही. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांना प्रवासासाठी खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. विद्यार्थ्यांना दररोज शिक्षणासाठी कळंब, लातूर, शिराढोण किंवा जवळच्या गावांमध्ये जाण्याची वेळ येते, पण बससेवा नसल्याने त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्ची पडतो. महिलांना आणि आजारी व्यक्तींना वेळेवर दवाखान्यात पोहोचणे अवघड होत आहे.

### रस्त्याची दुर्दशा खड्डेच खड्डे

दाभा पाटीपासून गावापर्यंतचा रस्ता हा अनेक वेळा दुरुस्त केला गेला. मात्र वर्षानुवर्षे या रस्त्यावर खड्डेच दिसून येतात. खड्ड्यांनी भरलेल्या या रस्त्यावरून वाहन चालवणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे झाले आहे. पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचल्याने शेतमाल बाहेर काढणे कठीण होते. त्यासोबतच रुग्णवाहिका किंवा इतर आपत्कालीन वाहनांनाही वेळेवर गावात पोहोचता येत नाही.

### डिजिटल युगात दाभा ‘डिजिटल अंधारात

मोबाईल नेटवर्कची सुविधा जवळपास नसल्यातच जमा आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन वर्ग व शैक्षणिक माहिती मिळणे कठीण जाते. शेतकऱ्यांना बाजारभाव, हवामान अंदाज व शासकीय योजना समजत नाहीत. आपत्कालीन परिस्थितीत नातेवाईकांशी संपर्क साधने कठीण जाते.



### आरोग्य सेवेचा अभाव

दाभा गावात प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत उपकेंद्र नाही. किरकोळ आजार असले तरी कळंब किंवा इतर ठिकाणी जावे लागते. गर्भवती महिलांना वेळेवर उपचार न मिळाल्याने मोठा धोका संभवतो. अपघात किंवा आकस्मिक आजाराच्या वेळी वेळेत मदत न मिळाल्याने रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होतो.

### गावकऱ्यांच्या या आहेत अपेक्षा:

- गावात तातडीने एसटी बससेवा सुरू करावी.
- दाभा पाटीदाभा रस्ता कायमस्वरूपी काँक्रीटीकरण अथवा डांबरीकरण करावे.
- मोबाईल टॉवर उभारून स्थिर नेटवर्क सुविधा उपलब्ध करून द्यावी.
- प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तातडीने मंजूर करून गावात कार्यान्वित करन्याची गरज.

# खानापूर येथून आंदोलकांसाठी मदत रवाना




**आरंभ मराठी | धाराशिव**

तालुक्यातील खानापूर येथून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषण स्थळी मराठा आंदोलकासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने भाकरी, चटणी, ठेचा, फरसान, बिस्किट पुड्याचे बॉक्स, पाणी बॉटलचे बॉक्स दोन पिकअप भरून आझाद मैदानच्या दिशेने खानापूर येथून रवाना झाले.निघण्यापूर्वी सर्व समाज बांधवांनी गणपती बाप्पा पुढे मराठा आरक्षण मिळण्यासाठी साकडे घातले.

# उमरगा चौरस्ता येथे अपघात; एक गंभीर, दोन किरकोळ जखमी

**आरंभ मराठी | उमरगा**

शहराजवळ असलेल्या लातूर–गुलबर्गा महामार्गावरील चौरस्ता येथील अशोक लिल्यांड शोरूम समोर शाहजनी औरादवरुन कसगीकडे जाणारा टाटा मॉजिक हा गुलबर्गा रोडवर येताच चालकाचा ताबा सुटल्याने अपघात होऊन एक जण गंभीर जखमी तर दोघांना किरकोळ मार लागला आहे. टाटा मॉजिक ( ३८ ५९८७) हे वाहन पल्टी झाले. त्यात चंपाबाई व्हलाप्पा चंदापुरे (वय ३०, रा. वानापल्ली ता. औराद) या गंभीर तर सरस्वती वैजनाथ भालेकर (४० रा. खेड), व बालाजी बंडाप्पा भालेकर (वय ५० रा. खेड ता.औराद जि. बिदर) हे किरकोळ जखमी झाले आहेत.



अपघाताची माहिती मिळताच अपघात ग्रस्ताच्या मदतीला मोफत असलेली जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थान नाणीज धामची रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल होऊन जखमीला उपजिल्हा रुग्णालयात चालक शेषेराव लवटे यांनी दाखल केले असल्याची माहिती दिली.

# युवासेना लोकसभा अध्यक्ष आनंद पाटील यांचा जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा

**आरंभ मराठी | मुंबई**

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मुंबईत आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे–पाटील यांना पाठिंबा जाहीर करून युवासेना धाराशिव लोकसभा अध्यक्ष आनंद पाटील यांनी सम ाजाची मागणी तातडीने सोडवावी, अशी मागणी केली आहे.मराठा समाजाला न्याय मिळावा यासाठी आम्ही शासनाकडे ठाम मागणी लावून धरणार आहोत. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण मराठा समाजाचा पूर्ण पाठिंबा आहे. राज्य सरकारने मराठा समाजाच्या मागणीचा विचार करून शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी धाराशिव युवासेना लोकसभा अध्यक्ष आनंद पाटील केली आहे.यावेळी आनंद पाटील म्हणाले की, मराठा समाजाला न्याय मिळावा यासाठी आम्ही शासनाकडे ठाम मागणी लावून धरणार आहोत. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण मराठा समाजाचा प्रचंड पाठिंबा आहे. राज्य सरकारने ही मागणी तातडीने मान्य करून समाजाला न्याय द्यावा.




# विद्यार्थ्यांनी मोबाईलकडे आपली बुद्धी गहाण ठेवू नये

## जिजाऊ ब्रिगेडच्या रेखाताई सुर्यवंशी यांचे आवाहन

**आरंभ मराठी | माडज**

मोबाईलमुळे विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीवर विपरीत परिणाम होत आहे. मुलांमध्ये दिवसेंदिवस स्मृतीभ्रंश वाढत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. मुलांनी मोबाईलपासून दूर राहत आपल्या कला, छंद जोपासले पाहिजेत. वेगवेगळ्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवला पाहिजे, असे प्रतिपादन शिवव्याख्यात्या, जिजाऊ ब्रिगेडच्या रेखाताई सुर्यवंशी यांनी केले. ग्रामीण प्रशाला माडज (ता. उमरगा) येथे गणेशोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव गायकवाड हे होते. तर मुख्याध्यापक रामजी सोळुंके यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. गणेशोत्सवानिमित्त ग्रामीण प्रशालेत आयोजित केलेल्या व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प



गुंफण्यासाठी रेखाताई सुर्यवंशी उपस्थित होत्या.‘म ोबाईलचा विळखा – स्वत:ला ओळखा’ या विषयावर सुर्यवंशी यांचे व्याख्यान यावेळी संपन्न झाले. आपल्या व्याख्यानात त्यांनी ऐतिहासिक व सद्यस्थितीतील आदर्श व्यक्तिमत्वाची उदाहरणे विद्यार्थ्यांना सांगितली. व मोबाईलचे फायदे आणि तोटे सांगितले. मोबाईलसंबंधी कविता व कथांचेही सादरीकरण यावेळी त्यांनी केले. आणि विद्यार्थ्यांनी विचारपूर्वक मोबाईलचा वापर करावा असे आवाहनही केले. यावेळी विठ्ठलराव गायकवाड यांनी अध्यक्षीय समारोप केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नंदना जमादार यांनी केले. प्रास्ताविक डॉ. बालाजी मदन इंगळे यांनी केले. तर श्रीमती अनिता कांबळे यांनी आभार मानले.

# येणेगुरमध्ये भक्तिभावाने गौरी पूजन

## येणेगूर येथे सोमवारी घरोघरी भक्तिभावाने,सहकुटुंब गौरी पूजन करण्यात आले

**आरंभ मराठी | येणेगूर**

गौरी आगमन गणपतीबरोबर येणाऱ्या गौरी सणाला एक वेगळं वलय आहे. यामध्ये गौरींची स्थापना करुन त्यांचे मनोभावे पूजन करण्यात येते. महाराष्ट्रात या सणाला महालक्ष्म ीपूजन असेही म्हणतात. प्रत्येक कुटुंबात आपल्या कुलाचाराप्रमाणे गौरी बसविल्या जातात. पहिल्या दिवशी घरातील तुळशीपासून पावला–पावलांनी डोक्यावरुन या गौरींना घरात आणले जाते. यावेळी, गौरी आली, सोन्याच्या पावली गौरी आली, चांदीच्या पावली गौरी आली, गाई वासराच्या पावली गौरी आली, पुत्र–पोत्रांच्या पावली असे म्हणत गणपतीच्या आईचे म्हणजेच गौरींचे माहेरवाशीणीसारखे स्वागत केले जाते. त्यांना नवीन वस्त्र, दागदागिने घालून सजविण्यात येते. ज्येष्ठगौरी अनुराधा नक्षत्रात येतात. ज्येष्ठा नक्षत्रात त्यांचे पूजन केले जाते. मूळ नक्षत्रात त्यांचे विसर्जन केले जाते. गणेशोत्सवाच्या निमित्ताने कुटुंबातील सगळे जण एकत्र येतात. त्यावेळी आपल्या घरी माहेरवाशीण म्हणून ३ दिवस राहणाऱ्या या गौरींसाठी छानशी सजावटही केली जाते. यामध्ये फुलांनी, घरातील स्त्रियांनी केलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंनी किंवा बाजारात तयार मिळणारे सजावटीचे सामान



वापरुन सजावट केली जाते. गौरीच्या मुखवट्यांमध्येही शाडूच्या, पितळ्याच्या, कापडाच्या, फायबरच्या असे बरेच प्रकार पाहायला मिळतात. काहींकडे केवळ मुखवट्यांची पूजा होते तर काहींकडे पूर्ण उभ्या गौरी असतात. तर काही जणांकडे तांब्यावर चेहरा रेखाटून गौरींचे पूजन केले जाते. पहिल्या दिवशी गौरीला भाजी आणि भाकरीचा नैवेद्य दाखविला जातो. ज्येष्ठा नक्षत्रावर महालक्ष्मीची पूजा करतात व महानैवेद्य दाखवितात. तिला गोडाधोडाचे जेवण केले जाते. यामध्ये १६ भाज्या, ५ कोशिंबिरी, पुरण, पंचपक्वान्न असा बेत केला जातो. यादिवशी सवाष्ण आणि ब्राह्मण यांना जेवायला बोलवायचीही पद्धत आहे. या गौरी आपल्याकडे माहेरवाशीण म्हणून आल्याने त्यांना खाण्यासाठी लाडू, चिवडा, करंज्या असे फराळाचे पदार्थ, मिठाई, फळे यांचा नैवेद्य दाखविण्यात येतो. तसेच गौरीला विविध प्रकारची फुले आणि पत्री वाहण्यात येतात. संध्याकाळी नातेवाईक, शेजारी आणि मित्र–मैत्रिणींना हळदी–कुंकवासाठी आणि गौरींचे दर्शन घेण्यासाठी बोलविण्यात येते.

# मुंबईतील आंदोलकांसाठी नळदुर्गकरांची मदत



**आरंभ मराठी | नळदुर्ग**

नळदुर्ग शहर सकल मराठा समाज यांच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानात मराठा आरक्षण आंदोलनासाठी जमलेल्या मराठा बांधवांना रसद म्हणून ८ हजार भाकरी, २० किलो शेंगा चटणी, ५ किलो ठेचा, ४ किलो लोणचे व २० बॉक्स पाणी बॉटल व इतर खाद्यपदार्थ घराघरातून जमा करण्यात आले व मुंबईकडे रविवारी रात्री दहा जण रवाना झाले. शहरातील काही मुस्लिम बांधवांनीही मदतीसाठी हातभार लावला. नळदुर्ग शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने घराघरातून भाकरी चटणी व इतर खाद्यपदार्थ पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे शहरातील मराठा गल्ली, माऊली नगर, व्यास नगर व इतर भागातून मोठ्या प्रमाणात शिबंदी बनवण्यात आली. रतिकांत नागणे, एकनाथ कदम, बबन चौधरी, गणेश शिंदे, राहुल बेले, आशिष जगदाळे, विशाल मोटे, संतोष साळुंखे, अजिंक्य पवार, पवन बाबर हे सर्वजण रसद घेऊन मुंबईला रवाना झाले.तानाजी जाधव, भगवंत सुरवसे, स्वप्निल काळे, शिवराम नागणे, वैभव पाटील, उमेश जाधव, संजय जाधव, शिवाजी सुरवसे, धनाजी जाधव, युवराज जगताप, आकाश काळे, प्रशांत पवार, उमेश मुळे यांच्यासह सकल मराठा समाजातील नागरिकांनी याकामी परिश्रम घेतले.

# तेर नगरी बौध्द समाजाची चैत्यभूमी

## भिक्खु पय्यानंद थेरो यांचे प्रतिपादन

**आरंभ मराठी | तेर**

मौर्य आणि सातवाहन काळात वर्तमान तेर नगरीचे प्राचीन तगर हे नाव होते. तेर नगरीचा मूळ प्राचीन इतिहास हा बौध्द धम्माचे केंद्र म्हणून इतिहासात ओळखला जातो. सम्राट अशोकाने तथागत बुध्दाच्या शरीर अस्थी धातूचे चैत्य ( करंडक ) जम्बूद्विपातील प्रम ुख शहरामध्ये प्रतिस्थापित केले होते.प्राचीन काळी तेर हे गाव हे आंतरराष्ट्रीय प्रसिद्ध बाजारपेठ असल्याचे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो (लातूर) यांनी केले आहे.दर रविवार चलो बुध्द विहार अभियान (लातूर) अंतर्गत भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या म ार्गदर्शनाखाली तेर येथील उत्तखनन झालेल्या प्राचीन पावन बौध्द चैत्य स्तूपाच्या प्रत्यक्ष सानिध्यात सामूहिक बुध्द वंदना,चैत्य पूजा, ध्यान, परित्राण आणि धम्मदेशना कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विशेष उपस्थिती म्हणून सरपंच दीदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, सुहास सरोदे, सुमेध वाघमारे,लातूर बौध्द महासभा जिल्हा अध्यक्ष आशा चिकटे, गुणवंत सोनवने,डॉ. दुष्यंत कटारे, प्रा. देवदत्त सावंत, सुशील चिकटे,अनिल हजारे,रमेश गायकवाड इत्यादी होते. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक ध्यान साधनेने झाली. त्यानंतर उपस्थित पूज्य भिक्खु संघाने त्रिरत्न वंदना परित्राण



सूत्रपठण केले.याप्रसंगी भंतेजी म्हणाले, तेर हे प्राचीन काळात मोठे सुसज्ज शहर होते. सातवाहन राजा वाशिष्टी पुत्र पुलूमावी यांच्या काळातील प्रांतिक उपराजधानी दर्जा तेर प्राप्त होता. सम्राट अशोकाने याठिकाणी बुध्दाच्या अस्थी धातू चैत्य प्रतिस्थापित करून तेर नगरीचे वैभव वाढविले होते. उत्तखननात सापडलेल्या बौध्द चैत्यामुळं तेर जगाच्या दृष्टीक्षेपात आले असल्याचे सांगून परिसरातील बौध्द बांधवानी आपल्या परिवारासह तेर येथील बौध्द चैत्य स्तूपास भेट द्यावी, असे आवाहन ही भंतेजी यांनी धम्म देशनेत केले.यावेळी कार्यक्रमास अतिथी म्हणून माजी सभापती कैलास शिंदे, बौध्द विचारवंत डॉ. कमलाकर कांबळे, म ाजी नगरसेवक पृथ्वीराज चिलवंत भारतीय बौध्द महासभेचे राजेंद्र निकाळजे इत्यादीचे भाषण झाली.याप्रसंगी पू. भिक्खु धम्मसार, भंते बोधीराज आर्या मेत्ता यांचीही धम्म देशना संपन्न झाली.कार्यक्रम यशस्वीतेसाठी मिलिंद धावारे, अनिरुध्द बनसोडे, करण ओहळ, उदय सोनवने, अमोल सावंत, सुध्दोधन धावारे, मंगेश वाघमारे, अभिजीत सावंत, मंगेश धावारे, दिनेश वाघमारे, अनुराग शिंदे, शुभम वैराग्य इत्यादींनी परिश्रम घेतले. यावेळी कार्यक्रमास विजय गायकवाड, पांडुरंग अंबुलगेकर,सुनील बनसोडे, धनंजय वाघमारे, भाऊसाहेब धावारेसह आदी लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील बौध्द उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आरंभ मराठी** जिल्ह्यातील बहुचर्चित पंचवार्षिक निवडणुकीनंतरची पहिलीच सभा

# श्री.महात्मा बसवेश्वर पतसंस्थेच्या १६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस प्रतिसाद

**आरंभ मराठी | मुरुम**

श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्रीराम मंगल कार्यालयात चेअरमन शिवशरण वरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. सभेत ३१ मार्च २०२५ अखेरचा ताळेबंद, नफातोटा खाते व विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यंदा संस्थेस २९ लाख ९३ हजार ८२८ रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, संस्थेकडे १३ कोटी ४० लाख ७२ हजार ९४९ रुपयांच्या ठेवी जमा आहेत. तसेच चालू आर्थिक वर्षात



संस्थेने १ कोटी ५३ लाख १६ हजार ४४५ रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. संस्थेची गुंतवणूक ४ कोटी ८५ लाख १३ हजार १२७ रुपये असून एकूण ३७२० सभासद आहेत. संस्थेच्या स्थापनेपासूनच ऑडिट वर्ग ’अ’ दर्जा प्राप्त असून, संपूर्ण संगणकीकृत कामकाजासह मानाचा ‘‘विभागीय दीपस्तंभ‘‘ पुरस्कार संस्थेला मिळाल्याचा उल्लेख अध्यक्षीय समारोपात करण्यात आला. कार्यक्रमाला शिवसेना नेते भीमराव वरनाळे, तालुका प्रमुख बळीमामा सुरवसे, चंद्रशेखर म ुदकण्णा, जगन्नाथ पाटील, व्यंकटराव पाटील, तानाजी फुकटे, चेतन पाटील, सायबणप्पा हिरमुखे, प्राचार्य दत्तात्रय इंगळे, तसेच अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सभेतील विषय पत्रिकेचे वाचन शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे यांनी केले तर सर्व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. सभेचे प्रास्ताविक प्राचार्य दत्तात्रय इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन संचालक मनोज बोंदर यांनी केले तर आभार प्रदर्शन अमृत वरनाळे यांनी मानले. यावेळी पंचक्रोशीतून मोठ्या संख्येने सभासद, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# शाम मुगळे यांचे राज्यस्तरीय सेट परीक्षेत घवघवीत यश

**आरंभ मराठी | उमरगा**



उमरगा शहरातील तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसीचे ग्रंथपाल मुगळे शाम हे राज्यस्तरीय सेट परीक्षा नुकतेच उत्तीर्ण झाले आहेत. प्राध्यापक शाम मुगळे यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात राज्यस्तरीय सहाय्यक प्राध्यापक परीक्षा उत्तीर्ण करून शैक्षणिक क्षेत्रात एक नवा मान मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे, उपाध्यक्ष आश्लेष शिवाजीराव मोरे, तसेच संचालक सुरेश बिराजदार यांनी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कवलजीत बिराजदार उपप्राचार्य. डॉ. प्रशांत माने यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मित्र परिवार यांनी कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.हे यश महाविद्यालयाच्या आणि शिक्षण क्षेत्राच्या योगदानामुळे मिळाले आहे. हे प्रमाणपत्र मिळवणं माझ्या कार्याची खरी ओळख आहे असे म्हणणे प्रा. शाम मुगळे यांचे आहे. सेट परीक्षा उत्तीर्ण होणारे प्रा.शाम मुगळे हे एक अभ्यासू असून त्यांच्या या यशामुळे संस्थेतील इतर शिक्षक व कर्मचारी प्रेरित झाले आहेत.